बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या निवडसूचीच्या निवड प्रक्रियेकरीता शिफारशीसाठी पात्रता निकष व कार्यपध्दती विहित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

शासन निर्णय क्रमांकः एआयएस-१०२५/प्र.क्र.४८/२०२५/भाप्रसे-१,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
**तारीख: २४.०७.२०२५.**

**वाचा:-**

१. भारतीय प्रशासकीय सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९५४
२. भारतीय प्रशासकीय सेवा (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७
३. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एआयएस १३०४/प्र.क्र.४९१/२००४/दहा, दि.२४.१२.२००४.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१०/प्र.क्र.५६३/२०१०/दहा, दि.०७.०९.२०११.
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१०१२/प्र.क्र.६९/२०१२(भाग-१)/दहा, दि.२०.१०.२०१५.
६. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१७/प्र.क्र.४५/२०१७)/दहा,दि.०४.०२.२०१७.
७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१७/प्र.क्र.४५/२०१७)/दहा,दि.२३.०२.२०१७.
८. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१७/प्र.क्र.४५/२०१७)/दहा,दि.१९.०४.२०१७.
९. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२०.०१.२०१८.
१०. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१८/प्र.क्र.३२/२०१८)/दहा,दि.२८.०२.२०१८.
११. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एआयएस १३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दि.०९.०७.२०१९.
१२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५/२०१९/दहा, दि.१३.०९.२०१९.
१३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५/२०१९/दहा, दि.०२.०९.२०२१.
१४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३२३/प्र.क्र.४४८/२०२३/दहा, दि.०३.११.२०२३.

**प्रस्तावना:-**

भारतीय प्रशासन सेवेत नियुक्तीचे खालीलप्रमाणे तीन मार्ग विहित करण्यात आले आहेत-

१) स्पर्धा परिक्षेद्वारे सरळसेवेने नियुक्ती (Appointment by Competitive Examination)
२) राज्य नागरी सेवेतून (SCS )पदोन्नतीने नियुक्ती (Appointment by Promotion)
३) बिगर राज्य नागरी सेवेतून (Non SCS) निवडीने नियुक्ती (Appointment by Selection)

उपरोक्तपैकी अ.क्र.३ येथील बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासकीय सेवेत निवडीने नियुक्ती ही भारतीय प्रशासकीय सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९५४ व भारतीय प्रशासकीय सेवा (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील तरतूदीनुसार केली जाते. सामान्यत: भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या कोट्यातील बिगर राज्य नागरी सेवेतील (Non-SCS) अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या पदांच्या प्रमाणात पद संख्या निश्चितीस केंद्र शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर बिगर राज्य नागरी सेवेतील पात्र अधिकाऱ्यांची १:५ या प्रमाणात संघ लोकसेवा आयोगास शिफारस करण्यात येते. मात्र सदर शिफारस करण्याकरीता भारतीय प्रशासकीय सेवा (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मध्ये कोणत्याही प्रकारची कार्यपध्दती विहीत केलेली नाही. बिगर राज्य नागरी सेवेतील अधिकाऱ्यांची १:५ या प्रमाणात निवडीकरीता कार्यपध्दती विहीत करण्याचे अधिकार हे राज्य शासनास आहेत. त्यामुळे सदर कार्यपध्दती विहित करण्याच्या

अनुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित केले आहेत. आता यापुढील सर्व निवडसूचींकरीता कायमस्वरुपी निवडप्रक्रिया निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेमध्ये निवडीने नियुक्तीच्या कार्यपद्धतीबाबतचे याआधीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन, यापुढील सर्व निवडसूचींसाठी बिगर राज्य नागरी सेवेतून भाप्रसेमध्ये निवडीने नियुक्तीकरीता, भाप्रसे (सेवाप्रवेश) नियम, १९५४ व भारतीय प्रशासकीय सेवा (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील तरतूदीनुसार पात्रता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांची १ : ५ या प्रमाणात संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता पात्रता निकष व कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णयः-**

बिगर राज्य नागरी सेवेतील अधिकाऱ्यांची भाप्रसेमध्ये निवडीने नियुक्ती ही केंद्र शासनाच्या भाप्रसे (सेवाप्रवेश) नियम, १९५४ मधील व भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ या अधिनियमान्वये करण्यात येईल. भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील नियम ४ (१) नुसार निवडीने नियुक्तीसाठी बिगर राज्य नागरी सेवेतील अधिकाऱ्याने पुढीलप्रमाणे पात्रता धारण करणे आवश्यक आहे:-

*अ) अत्युत्कृष्ट गुणवत्ता व क्षमता,*

*ब) राजपत्रित पदावर स्थायीकरण झालेले असावे,*

**क) उप जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष घोषित पदावर निवडसूची वर्षाच्या दि. ०१ जानेवारी रोजी किमान ८ वर्षे सेवा झालेली असावी.*

*ड) निवडसूचीच्या वर्षाच्या दि.०१ जानेवारी रोजी त्याचे वय ५६ वर्षांपेक्षा जास्त नसावे.*

** भाप्रसे (निवडीने नियुक्ती) अधिनियम, १९९७ मधील नियम ४ (१) (iii) च्या तरतुदीनुसार संबंधित उमेदवाराची उप जिल्हाधिकारी पदाच्या समकक्ष पदावर ८ वर्षांची सलग व प्रत्यक्ष सेवा होणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या सेवा कालावधीची गणना करताना* ***केंद्र शासनाचे उपरोक्त नियम लागू होतील.***

२. बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवडीने नियुक्तीसाठी संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता अधिकाऱ्यांची निवड (Shortlisting) करण्याकरिता पात्र अधिकाऱ्यांच्या नावांचा प्रस्ताव सादर करण्यास सामान्य प्रशासन विभागाकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर सर्व प्रशासकीय विभागांनी सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार पात्र अधिकाऱ्यांचा परिपूर्ण प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करणे आवश्यक राहील. **सर्व प्रशासकीय विभागांनी सामान्य प्रशासन विभागास प्रस्ताव पाठविताना अधिकाऱ्यांची पात्रता तपासण्यासाठी पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक राहील-**

i) भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील नियम ४ व सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दि.०९.०७.२०१९ नुसार पात्र अधिकाऱ्यांचे प्रस्ताव विभागाने सादर करावेत.

ii) निवडसूची वर्षाच्या ३१ मार्च पर्यंतचे मागील सलग ८ वर्षांचे सर्व संस्करण पूर्ण होऊन अंतिम झालेले गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत. अशा मागील ८ वर्षांपैकी किमान ७ वर्षांचे गोपनीय अहवाल “अत्युत्कृष्ट” (अ+) असणे आवश्यक राहील. उर्वरीत १ गोपनीय अहवालाची प्रतवारी “उत्कृष्ट”(अ) अथवा “चांगला” (ब) असल्यास हरकत नाही.

iii) गोपनीय अहवालांची प्रतवारी उंचावण्यात आलेली असेल तर अशा गोपनीय अहवालांची प्रतवारी उंचावण्याबाबत करण्यात आलेली कार्यवाही ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.- सीएफआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दि.०१.११.२०११ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक

सूचना व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांस अनुसरून असेल तरच अशा उंचावण्यात आलेल्या गोपनीय अहवालांची प्रतवारी विचारात घेण्यात यावी.

iv) वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२ नुसार मागील ८ वर्षाच्या कालावधीत वैध कारणास्तव देय व अनुज्ञेय विशेष असाधारण रजेवर असलेल्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेताना त्यांच्या विशेष असाधारण रजेचा कालावधी वगळून मागील तेवढया कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन असे एकूण ०८ वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे उपलब्ध गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेण्यात यावेत.

v) अत्युत्कृष्ट गोपनीय अहवालांची गणना करताना एखाद्या गोपनीय अहवाल वर्षात ६ महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध असेल तर सदर गोपनीय अहवालाची जी प्रतवारी असेल ती संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी.

vi) एखाद्या गोपनीय अहवाल वर्षात प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिका-यांचा कालावधी ३ महिन्यांपेक्षा कमी असल्याच्या कारणास्तव/सक्तीचा प्रतिक्षा कालावधी असल्याच्या कारणास्तव/ वैध कारणास्तव देय व अनुज्ञेय मंजूर करण्यात आलेल्या रजेमुळे ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC असेल तर त्याच वर्षीच्या उपलब्ध असलेल्या उर्वरित कालावधीच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी ही त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी.

vii) केंद्र अथवा राज्य शासनाकडून आयोजित/पुरस्कृत/राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने घेतलेल्या प्रशिक्षणाच्या कारणास्तव ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC असेल तर त्याच वर्षीच्या उपलब्ध असलेल्या कालावधीच्या उर्वरित गोपनीय अहवालाची प्रतवारी ही त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी. तसेच या प्रशिक्षणाच्या कारणास्तव एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसेल तर त्यांच्या सदर प्रशिक्षणाचा कालावधी वगळून मागील तेवढ्या कालावधीचे याप्रमाणे एकूण ८ वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत.

३. उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सामान्य प्रशासन विभागास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १ : ५ या प्रमाणात (१ रिक्त पदासाठी ५ अधिकारी या प्रमाणात) पात्र अधिकाऱ्यांची संघ लोक सेवा आयोगास शिफारस करण्याकरिता खालीलप्रमाणे कायमस्वरूपी कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे-

i) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार संबंधित पात्र अधिकाऱ्यांची ६० गुणांची लेखी परीक्षा आयोजित करण्यात येईल.

ii) सदर लेखी परीक्षेचे स्वरुप बहुपर्यायी [MCQ (Objective)] असेल. चुकीच्या उत्तरासाठी ऋणात्मक गुण पध्दत लागू राहिल.

iii) परीक्षेचा अभ्यासक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार राहील.

iv) लेखी परीक्षेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेले परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.

v) बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवडीकरीता संघ लोकसेवा आयोगास जितक्या अधिकाऱ्यांची (१:५) शिफारस करावयाची आहे, त्याच्या ३ पट अधिकाऱ्यांची निवड लेखी परीक्षेमधून करण्यात येईल. उपरोक्त प्रमाणे ३ पट अधिकाऱ्यांची निवड करताना त्यातील शेवटच्या अधिकाऱ्यास मिळालेल्या गुणाइतके गुण मिळालेल्या सर्व अधिकाऱ्यांना पुढील गुणांकनासाठी पात्र समजण्यात येईल.

vi) उपरोक्त लेखी परिक्षेमधून पात्र ठरलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे लेखी परीक्षा (६० गुण) + सेवा कालावधीचे गुण (२० गुण) + गोपनीय अहवाल (२० गुण) यांचे गुण एकत्रित करुन एकूण १०० गुणांचे मुल्यांकन करण्यात येईल. सदर मुल्यांकनानुसार गुणानुक्रमे पहिल्या १:५ (०१ रिक्त पदासाठी ०५

अधिकारी) या प्रमाणात अधिकाऱ्यांच्या नावाची अंतिम शिफारस संघ लोकसेवा आयोगास करण्यात येईल.

vii) **सेवा कालावधीसाठीच्या २० गुणांची विभागणी सेवा कालावधीनिहाय पुढीलप्रमाणे राहील**:-

| **एकूण सेवा कालावधी (पूर्ण वर्षामध्ये)** | **गुण** |
|---|---|
| ८ | ५ |
| ९ | ६ |
| १० | ७ |
| ११ | ८ |
| १२ | ९ |
| १३ | १० |
| १४ | ११ |
| १५ | १२ |
| १६ | १३ |
| १७ | १४ |
| १८ | १५ |
| १९ | १६ |
| २० | १७ |
| २१ | १८ |
| २२ | १९ |
| २३ वर्षे व त्यावरील सेवा | **२०** |

viii) **गोपनीय अहवालांच्या २० गुणांची विभागणी पुढीलप्रमाणे राहील:-**

एकूण ८ वर्षांचे गोपनीय अहवाल तपासण्यात येतील. प्रत्येक **"अतिउत्कृष्ट"** गोपनीय अहवालासाठी (अ+) **२.५ गुण** व **"उत्कृष्ट"** अहवालासाठी (अ) **१.५ गुण** व **"चांगला"** अहवालासाठी (ब) **१ गुण** देण्यात येईल.

ix) अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी (Ranking) निश्चित करताना **वयाने ज्येष्ठ** असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल. तदनंतरही पात्र उमेदवारांपैकी समान गुण धारण करणा-या उमेदवारांचे वय समान असल्यास **गट-अ पदावरील सेवा कालावधीत ज्येष्ठ असलेल्या पात्र उमेदवारास प्रधान्य** देण्यात येईल. उक्त सर्व निकष समान असल्यास पात्र उमेदवारांचा प्राधान्य क्रम निश्चित करण्यासाठीचा निकष ठरविण्याचा अंतिम निर्णय राज्य शासनाचा राहील.

x) भारतीय प्रशासकीय सेवा ही अखिल भारतीय सेवा असल्याने सदर निवड प्रक्रीयेसाठी भाप्रसे (सेवाप्रवेश) नियम, १९५४ आणि भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ च्या तरतूदी लागू राहतील. भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील विनियम ४(१) (iii) नुसार भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीकरीता उप जिल्हाधिकारी पदाच्या समकक्ष पदावर ८ वर्षांची सलग (continuous service/ in a Substantive capacity) सेवा होणे आवश्यक आहे. सबब, बिगर राज्य नागरी सेवेतील अधिका-यांच्या **सेवा कालावधीची गणना करताना मानीव दिनांकापासूनची सेवा ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

xi) बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासकीय सेवेत निवडीने नियुक्तीकरीता पद उपलब्धतेनुसार त्या-त्या निवडसूचीकरीता लेखी परीक्षा आयोजनाबाबतचे पत्र सामान्य प्रशासन विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल. त्याबाबतचा परीक्षा अभ्यासक्रम, वेळापत्रक इत्यादी सर्व सूचना संबंधित उमेदवारांच्या निदर्शनास आणून देणे व परीक्षेसाठी उमेदवारांचे नामनिर्देशन पाठवित असताना सदर परीक्षेसाठी असणारे निकष तपासून केवळ त्या निकषात बसणाऱ्या उमेदवारांचेच प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित प्रशासकीय विभागाची असेल.

४. **उपरोक्त पात्रता निकष व निवडीची कार्यपध्दती ही निवडसूची सन २०२४ व त्यापुढील सर्व निवडसूचींकरीता लागू होईल.**

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०७२४१६०२४३१२०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(श्वेता ह. सुर्यवंशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव,
४. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
८. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली,
९. सचिव, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली,
१०. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
११. सर्व मंत्रालयीन विभाग,
१२. निवड नस्ती.

# परिशिष्ट ‘अ’

# Indicative Syllabus for written examination for selection of Non-SCS officers to the IAS

1. Good knowledge of history, culture and geography of the State of Maharashtra, Socio-economic problems of Maharashtra & policy initiatives for addressing them.

2. Various organs of Government of Maharashtra-different organisations/institutes i.e. MPSC, Election commission, MAT, Lokayukt, Information commission, Right to Service Commission etc.

3. A broad awareness of India's historical background for the evolution of its diverse and multi-cultural society, its composite culture and its rich heritage; India's struggle for freedom and the emergence of the Republic of India.

4. A broad perspective of Indian political system, concepts of parliamentary democracy, cabinet form of government, unitary vs federal systems of government, rule of law, rights, judicial review etc., characteristics of Indian Constitution, Indian federalism, Centre State relations regional disparities, regional identities and conflicts.

5. Basic knowledge of India's economy, economic inequalities and social disparities. India's internal and external trade. India's monetary and fiscal policies. The role, responsibility and strategy formulation of Governments (Centre and States) in social and economic development and in improving the Human Development Indices. Emerging trends and issues in India's internal trade, taxation, economy and financial management. Digitalization of financial system, reduction of corruption and promotion of financial inclusion.

6. Emerging trends in governance, good governance practices, e-governance, e-office, KMS (knowledge management system), use of information technology and communication technology in government business, role and impact of social media in governance, citizens charter, transparency in governance including policies and initiatives of the government in furtherance of this objective viz., RTI, Lokpal etc., quality of service delivery, Policies and initiatives of the government for inclusive growth and women's empowerment, disaster management, utilization of public funds and such other knowledge of governance which a civil service officer is expected to possess.

7. Awareness of India's human capital, India's demographic profile, India's policies and programmes to take advantage of "Demographic Dividend".

8. Fundamental awareness of India's ecology and environment, India's vulnerability to 'Global Warming and Climate Change', India's preparedness, policies and programmes for adaptation to the impending hazards and dangers of global warming and climate change etc. Ecological assessment of developmental projects, integration of environmental costs in budgets and development programmes. Emerging issues and developments in Ecology and Environment at national and international level.

9. Fundamental awareness of India's natural resource base including biodiversity. The concepts of judicious and sustainable use of natural resources. The role, responsibility, plans, policies and programmes of the Governments (Centre and States) in the conservation of natural resources including Genetic Resources.

10. Concepts of Sustainable development, awareness of emerging issues and trends in this regard. India's preparedness and programmes to achieve "Sustainable Development Goals"

11. Awareness of India's scientific and technological power and progress, developing a high-tech, knowledge- based economy; and visualizing India as an advanced country.

12. A broad awareness of developments in international arena. Emerging trends in geopolitics, economy, regional rivalries and conflicts. United Nations and various associations and groupings like ASEAN, BRICS, G4, BIMSTEC, SCO etc., and important and influential international voluntary organization. India's strategic interests and core concerns. India's bilateral and multilateral relations including trade relations. An awareness of emerging trends and developments in global economy and their impact on India; the phenomenon of globalization, India's integration in globalization, consequences of globalization, etc. and such other aspects of knowledge of global politics and economy which a civil service officer is expected to possess.

*********

**Annexure-3.4 -A**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**No.**

Department,
Mantralaya, Mumbai – 400 032.
**Date :-**

**Consolidated statement of Non-State Civil Service officers for consideration for Appointment to the IAS as on 1st January of Select List year 202 ---**

| Sr. No | Name of the officers (S/Shri) | Whether SC/ST/ OBC | Date of birth | Post Held (declared equivalent to the post of Dy. Collector in the State Civil Service). | Date from which continuously holding the post (declared equivalent to the post of Dy. Collector in the State Civil Service). | Whether the post held is gazetted and in substantive capacity. if so, the date of confirmation in that post. | Pay scale of the Post (declared equivalent to the post of Dy. Collector in the State Civil Service). * | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| **1** | | | | | | | | |
| **2** | | | | | | | | |
| **3** | | | | | | | | |
| **4** | | | | | | | | |
| **5** | | | | | | | | |

*** Note:- The Pay Scales indicated are as per the 7th Pay Commission and of current post held.**

**( )**
**Addl. Chief Secretary/ Principal Secretary/Secretary to the Government.**

***GOVERNMENT OF MAHARASHTRA***

No.
Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Date:

## (A) DETAILS OF DISCIPLINARY PROCEDINGS PENDING AGAINIST ELIGIBLE OFFICERS

| Sr. No. | NAME OF OFFICER (S) | DATE OF ISSUE OF CHARGESHEET TO THE OFFICERS | BRIEF FACTS AND NATURE OF CHARGES | PRESENT STATUS |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

## (B) DETAILS OF CRIMINAL PROCEEDINGS PENDING AGAINST ELIGIBLE OFFICERS.

| Sr. No. | NAME OF OFFICER (S) | DATE OF FILLIG OF CHARGESHEET BEFORE THE COURT | BRIEF FACTS AND NATURE OF CHARGES | PRESENT STATUS |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

**ANNEXURE- 4.2**

***GOVERNMENT OF MAHARASHTRA***

No.
Department,
Mantralaya, Mumbai- 400 032.
Date:

**DETAILS OF PENALTIES IMPOSED ON ELIGIBLE OFFICERS DURING THE LAST 10 YEARS**

| Sr. No. | Name of the Officer (S) | YEAR IN WHICH OFFENCE IS COMMITTED | DATE OF ISSUE OF CHARGESHEET | DATE ON WHICH PENALTY IMPOSED | NATURE OF PENALTY | PERIOD OF CURRENCY OF THE PENALTY AND THE DATE WHEN THE CURRENCY OF PENALTY WILL BE OVER | WHETHER ANY APPEAL HAS BEEN FILED AND IF SO WHETHER THERE IS ANY INTERIM STAY / STAY. | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

***GOVERNMENT OF MAHARASHTRA***

No.
Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Date:

## FORMAT FOR INTEGRITY CERTIFICATE

**A. Format for certifying the Integrity Certificate**

**Dated:**

## INTEGRITY CERTIFICATE

The State Government **certified the integrity** of following officers with reference to the entries in his/their Annual Confidential Reports:-

| Sr. No. | Name of (S/Shri) | Serial No. in the Statement |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

## FORMAT FOR INTEGRITY CERTIFICATE

**B. Format for withholding the Integrity Certificate**

**Dated:**

## INTEGRITY CERTIFICATE

**The** State Government **Withholds the integrity** of following officer(s) for the reasons indicated against each:-

| Sr.No. | Name of (S/Shri) | Serial No. in the Statement | Reasons (in brief) for withholding the integrity certificate |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary**
**to the Government**

**ANNEXURE-6**

***GOVERNMENT OF MAHARASHTRA***

No.
Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Date:

**Certificates regarding communication of Adverse remarks in respect of eligible officers**

(i) Adverse remarks in the character rolls of the following eligible officers have not been communicated by the State Government to the officers concerned

| Sr. No | Name of the Officer | Sr.No.in the statement | Period |
|---|---|---|---|
| | | | |

(ii) Adverse entries in respect of the following eligible officers have been communicated, but no representation have been so far received from the officer concerned but the time limit to representation is not yet over.

| Sr. No | Name of the Officer | Sr.No.in the statement | Period |
|---|---|---|---|
| | | | |

(iii) Representation against adverse entries in respect of the following officers have been received within the stipulated time, but the decision of the State Government is yet to be taken.

| Sr. No | Name of the Officer | Sr.No.in the statement | Period |
|---|---|---|---|
| | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

**ANNEXURE-7**

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

No.

Department,

Mantralaya, Mumbai -- 400 032.

Date:

## Statement of ACRs furnished to the Commission.

| Sr. | Name of Officers (S/Sh.) | period of ACR (preceding 10 years) (Separate row for each part ACR) e.g. 20 – to 20- To 20 – to 20 -- | Whether Available | | | Whether ACR is duly reported /reviewed / accepted ? | | Whether the ACR is vaild as per ACR Rules of State | | If the ACR written in Regional language, whether English translation (including the self assessment) duly attested by an officer not below the rank of Secretary to State Govt. added in the dossier? | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | If yes, mark (✓) | If no, whether No Report Certificate (NRC) with valid @ reasons added? | | If yes, mark (✓) | If no, indicate the deficiency with reasons e.g. not reviewed etc. | If yes, mark (✓) | If no, indicate reasons | If yes, mark (✓) | If no, indicate reasons | |
| | | | | If yes, mark (✓) | If no, indicate reasons | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

@ Valid reasons as per DOPT letter No. F.14015/7/88-AIS(I) dated 22.07.1988.

* The State Government is required to furnish the complete ACR dossier of the officer. The ACRs for preceding five years may be duly flagged. **If some ACRs are not written and NRC added, preceding ACRs may be flagged and details furnished as above.**
* No photocopy of ACR is accepted. In exceptional circumstances, if a photocopy is furnished, it should be duly attested and reasons for not sending the original ACR may be indicated.
* The ACRs furnished to the Commission should be minutely scrutinized and furnished to the Commission after rectifying the deficiencies.
* The validity of the ACRs furnished to the Commission may be checked by the State Government in terms of the ACR rules of the State Govt., if any. The validity of the UN Report/Special Report, etc., if any, as per ACR Rules of State Government may be indicated clearly.

( )

Name________________

Designation____________

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

**ANNEXURE-8**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**No.**
**Department,**
**Mantralaya, Mumbai - 400 032.**
**Date:**

**A Statement showing Court Cases and Court orders having bearing on the Select List**

| Sr No. | Name of Applicants (S/Shri) | Case No. | Name of Court | Date of Orders and Compliance Date | Directions (in brief) | Whether appeals have been filed and if so whether stay orders have been obtained | Implications on the current Select List | Whether a copy of the Orders has been enclosed | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

## DECLARATION

I hereby declare that I have not more than one wife living.

( )

**Place :**
**Date:**

## DECLARATION

I hereby declare my unconditional willingness for appointment to the INDIAN ADMINISTRATIVE SERVICE in case of selection.

I also further declare that I agree to terminate my lien in the post held by me substantively in the Non-State Civil Service on eventual substantive appointment to the INDIAN ADMINISTRATIVE SERVICE.

( )

**Place :**
**Date:**